Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

VOL- IX | ISSUE- V | MAY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# केतकी व समाजमाध्यमविषयक प्रश्न आणि उत्तरे

**डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे,**
प्रोफेसर, वृत्तपत्रविद्या आणि जनसंवाद,
श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी-431401
Email :-- ramanand.vyavahare@gmail.com

**प्रस्तावना :-**

केतकी चितळे या टेलिव्हिजन इंडस्ट्रीमधील अभिनेत्रीने पवार यांच्याविरुद्ध फेसबुकवर आक्षेपार्ह विधाने असलेली पोस्ट टाकून खळबळ उडवून दिली आहे. त्यामुळे समाजमाध्यमाविषयक वेगवेगळे प्रश्न निर्माण झाले असून त्यांच्या सोडवणूकीसाठी प्रयत्नांची आवश्यकता वाटते. अन्यथा समाजमाध्यमे ही स्फोटक, विघातक ठरू शकतील. समाजमाध्यमांव्दारे व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य भारतातील प्रत्येक नागरिकाला आहे; परंतु त्याच्या मर्यादा लक्षात घेण्याची आवशकता आहे. जर वापरकर्ते मर्यादांचे उल्लंघन करू लागले तर पोलिस, न्याय यंत्रणा आपले कर्तव्य चोखपणे पार पाडेल. फक्त केतकीच नव्हे, तर भारतात सर्वत्र समाजमाध्यमांव्दारे गरळ ओकण्याचे काम होताना दिसत आहे. यांना आवर घालण्यासाठी कायदे कडक करावे लागतील. शिक्षा कठोर कराव्या लागतील. जहरी टिका, करीत गरळ ओकणाऱ्यांना वेळीच प्रतिबंध करावा लागेल नाही तर समाजाचे स्वास्थ्य धोक्यात जाण्याची मोठी भिती वाटते.

जगभरात आणि भारतात फेसबुक या समाजमाध्यमाचे वापरकर्ते दिवसेंदिवस वाढत असून त्यांना भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याबद्दल, त्यावरील निर्बंधाबद्दल माहिती असणे आवश्यक आहे. ही जबाबदारी प्रत्येक वापरकर्त्यांची असून ती जर ते पाळत नसतील तर त्यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे. फेसबुकसारख्या प्रभावी समाजमाध्यमाचा वापर योग्य रितीने व्हावा यासाठी कायदे, शिक्षा कडक करण्याची आवश्यकता आहे. समाजमाध्यमांचा वापर करताना सर्वांनी नियम, कायदे पाळण्याची गरज आहे. त्याशिवाय आपल्याला विकासाकडे झेपावता येणार नाही.

**उद्देश :-**

1) केतकी चितळेने निर्माण केलेल्या समाजमाध्यमविषयक प्रश्नांचा आढावा घेणे.
2) फेसबुक या समाजमाध्यमाची पोहोच (Reach), शक्ती (Power) आणि व्याप्ती (Scope) स्पष्ट करून सांगणे.
3) समाजमाध्यमांचे स्वातंत्र्य आणि त्यावरील मर्यादांची चर्चा करणे.
4) केतकी चितळेच्या आक्षेपार्ह पोस्ट टाकण्याच्या हेतूंचा आढावा घेणे.
5) केतकी चितळेने निर्माण केलेल्या समाजमाध्यमविषयक प्रश्नांवरील उत्तरांची मांडणी करणे.

**संशोधन पध्दती :-**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय “केतकी : समाजमाध्यमविषयक प्रश्न आणि उत्तरे” असा आहे. केतकी चितळेने पवारसाहेब यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर चुकीची पोस्ट फेसबूक या समाजमाध्यमावर टाकून खळबळ उडविली आहे. त्यामूळे मोठे शक्तीशाली असलेल्या जगात सर्वत्र भरपूर प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या समाजमाध्यमांविषयी काही गंभीर प्रश्न, समस्या (Problem) निर्माण झालेले आहेत. पोलीस यंत्रणा या प्रकरणाचा तपास करेल. न्यायालयात खटला चालेल. केतकीला शिक्षादेखील होईल ; परंतू केतकीने निर्माण केलेल्या समाजमाध्यमविषयक विविध आणि गंभीर स्वरूपाच्या प्रश्नांची चर्चा हाणे आवश्यक आहे. फेसबुक समाजमाध्यमाची मोठी जगभर पोहोच असून ते भविष्यात अधिक प्रभावी माध्यम म्हणून पुढे येईल. जगभरात सर्वत्र समाजमाध्यमांचा वापर वाढू

लागल्याने मीडिया साक्षरतेच्या अनुषंगाने प्रत्येकालाच समाजमाध्यमांचे स्वातंत्र्य व त्यावरील मर्यादांची माहिती असणे आवश्यक बनले आहे. केतकीने हे असे का केले ? तिचा बोलविता धनी कोण ? हे स्पष्ट झाले पाहिजे. त्याचबरोबर केतकीने निर्माण केलेल्या गंभीर प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. त्यासाठी प्रस्तूत शोध निबंधाची मांडणी करीत असताना वर्णनात्मक तसेच विश्लेषणात्मक पध्दतीचा अवलंब केला ओह. त्यासाठी सर्व प्रसारमाध्यमांव्दारे प्रकाशित, प्रसारित बातम्या, वृत्तलेख, लेख, अग्रलेख वाचकांची पत्रे, स्फुटलेख इत्यादींचे संदर्भ अभ्यासून तज्ञांनी लिहिलेल्या लेखांचा आधार घेतला आहे. लेखकाने स्वत:ची मते अनुभव, निरीक्षणे, दृष्टिकोन इत्यादींच्या आधारे शोधनिबंधाची मांडणी केली आहे.

**केतकी चितळे प्रकरण :-**

14 मे रोजी केतकी चितळेने राष्ट्रवादी काँग्रेसने अध्यक्ष, माजी केंद्रीय कृषि मंत्री, शरदचंद्रजी पवार यांच्याबद्दल खालील पोस्ट फेसबूकवर टाकली.

*"तुका म्हणे पवारा। नको उठवू तोंडाचा फवारा ॥*
*ऍंशी झाले आता उरक। वाट पहातो नरक ॥*
*सगळे पडले उरले सुके। सतरा वेळा लाळ गळे ॥*
*समर्थांचे काढतो माप। ते तर तुझ्या बापाचेही बाप ॥*
*ब्राम्हणांचा तूला मत्सर। कोण रे तू ? तू तर मच्छर ॥*
*भरला तूझा पापघडा। गप ! नाही तर होईल राडा ॥*
*खाऊन फुकटचं घबाड। वाकडं झालं तुझं थोबाड ॥*
*याला ओरबाड त्याला ओरबाड। तू तर लबाडयांचा लंबाड ॥*

Advocate Nitin Bhave"

प्रस्तुत पोस्टमध्ये अत्यंत वाईट शब्दात शरद पवार यांच्याबद्दल लिहिलेले आहे. पोस्टच्या शेवटी ॲड नितीन भावे असे नाव असले तरी पोस्ट मात्र केतकीने टाकली. त्यामूळे शरद पवार यांची मोठी बदनामी झाली आहे.

**कोण आहे केतकी चितळे ?**

29 वर्षाची केतकी चितळे ही दूरचित्रवाणी, चित्रपट अभिनेत्री आहे. तिने मॉडेल म्हणून काम केले 30 डिसेंबर 1992 रोजी तिचा जन्म पुण्यात झाला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात तिने पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर ती मुंबईच्या ठाण्याला आली. "आंबट गोड", "सॉस बिना ससुराल" या दूरचित्रवाणी मालिकेत तिने काम केले. "भोभो" हा तिचा चित्रपट 2016 मध्ये रिलिज झाला आहे. "तुझा माझा ब्रेकअप" या मराठी दूरचित्रवाणी मालिकेत काम केलं आहे.

यापूर्वी केतकीने 11 जुलै 2020 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख एकेरी केला होता. "नवबौध्द 6 डिसेंबरला फुकट मुंबई दर्शनाला येतात" अशा आशयाची पोस्ट फेसबुकवर लिहिली होती याबद्दल तिच्याविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. शरद पवार यांच्याबद्दल टाकलेल्या पोस्टमुळे केतकीविरूध्द संतापाची लाट आहे. तिच्याविरूध्द अनेक गुन्हे दाखल झाले आहेत. केतकी विरूध्द 500, 501, 153 कलमान्वये गुन्हा दाखल केला. यावरूनच तिला अटक झाली, सुटकादेखील होईल. नाशिकच्या निखील भामरे नामक युवकाने सुध्दा शरद पवार यांच्याबद्दल आक्षेपार्ह लिखानाची पोस्ट फेसबूकवर टाकली. प्रतिष्ठित, मोठया, सन्माननीय व्यक्तिंबद्दल समाजमाध्यमांव्दारे बदनामीकारक माहिती देऊन या व्यक्तिंना काय साध्य करायचे आहे हेच समजत नाही. भविष्यात अनेक केतकी तयार होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामूळे समाजमाध्यमांचा चुकीचा वापर करणाऱ्यांना जनजागृती तसेच प्रबोधनातून सावध करण्याची गरज आहे. जे कोणी जाणीवपूर्वक गैरवापर करतील त्यांना कायद्याने शिक्षा झाली पाहिजे.

**फेसबूक प्रचंड मोठे जागतिक समाजमाध्यम :-**

फेसबुकची वाढ मोठी असलेले जगातील टॉप दहा राष्ट्रे फेसबुकचे जगभरात फार मोठे जाळे आहे. युनायटेड स्टेटस (युएस), इंडोनेशियामध्ये, मेक्सिकोमध्ये, फिलिपाईन्समध्ये ,तुर्कीमध्ये, भारतामध्ये त्याची वाढ झपाटयाने सुरू आहे.

Source :- Data manually collected from facebakers.com on 14 July 20210

**फेसबुकचे भारतातील जाळे :-**

फेसबुकने भारतासारख्या प्रचंड मोठया लोकसंख्येच्या देशात मोठे जाळे विणले आहे. जानेवारी 2020 मध्ये संपूर्ण भारतात फेसबुकचे 324 000 000 युजर्स होते. त्याचे प्रमाण भारतातील एकुण लोकसंख्येच्या 22.8 टक्के होते. त्यापैकी पुरुष युजर्स हे 76 टक्के तर महिला युजर्स हया 24 टक्के आहेत. 25 ते 34 वयोगटातील युजर्स हे बहुसंखेने म्हणजे 125 000 000 आढळले असून त्यांची टक्केवारी 38.6 आहे. 18 ते 24 वयोगटातील युजर्स हे 32.7 टक्के असून, 35 ते 44 वयोगटातील युजर्स हे 12.8 टक्के आहेत.

फेब्रुवारी 2020 ते मे 2022 या कालावधीत फेसबुकचे युजर्स मोठया प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.

In India Major cities with the most facebook users
भारतातील प्रमुख शहरातील फेसबुक युजर्स

| Sr. No. | Name of the Citi | Facebook Users |
|---|---|---|
| 1. | Delhi | 9,200,000 |
| 2. | Mumbia | 6,800,000 |
| 3. | Bangalore | 4,800,000 |
| 4. | Hyderabad | 4,400,000 |
| 5. | Pune | 4,200,000 |
| 6. | Chennai | 4,200,000 |
| 7. | Kolkata | 3,600,000 |
| 8. | Jaipur | 1,660,000 |
| 9. | Ahmedabad | 1,640,000 |
| 10. | Lucknow | 1,440,000 |
| 11. | Surat | 1,440,000 |

एका पाहणीनुसार भारतातील शहरे तसेच ग्रामीण भागात सुध्दा फेसबुकचे युजर्स मोठया प्रमाणावर वाढत आहेत.

**केतकीचा हेतू :-**

केतकी चितळे एक मॉडल आहे. मॉडेलिंग करीत करीत ती दूरचित्रवाणी माध्यमात अभिनेत्री (छोटा पडदा) म्हणून पुढे आली. तिने एका चित्रपटात सुध्दा भूमिका केलीय. नंतर मात्र ती एकाही चित्रपटात दिसली नाही. देशात छोठया पडद्यावर भूमिका करणाऱ्या अनेक महिला- मुली आहेत. काही स्थिरावलेल्या आहेत, तर काही धडपडताना दिसतात. माझ्या मते केतकी धड मॉडेलिंग क्षेत्रात स्थिरावलेली नाही तसेच छोटया पडद्यावरही तिला फारसे यश मिळविता आलेले नाही. चित्रपटसृष्टित तर तिचे स्थान अगदी नगण्यच दिसते. याचा अर्थ केतकी आपल्या आयुष्यात स्थिर नाही. मिळविलेल्या माहितीनुसार ती अविवाहीत आहे तिचे कुटुंब दिसत नाही. अशा परिस्थितीत केतकी केवळ आणि केवळ प्रकाशात (उजेडात), चर्चेत, प्रसारमाध्यमांमध्ये सतत नाव येण्यासाठी नसती उठाठेव करीत असावी. यासाठी तिने फेसबुकचा वापर सुरू केलेला आहे.

यापूर्वी केतकीने छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल एकेरी उल्लेख करून आपल्या अकलेचे तारे तोडलेले आहेत. एका दुसऱ्या प्रकरणात तिच्यावर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल आहे आणि आता तिने ॲड. भावे यांच्या आडून गलिच्छ भाषेत शरद पवार यांच्याबद्दल पोस्ट टाकली आहे.

यावरून केतकी फार हुशार, बुध्दीमान तर अजिबातच ठरत नाही. त्याचबरोबर ती वैफल्यग्रस्त असल्याचे स्पष्ट होते. हे सर्व प्रकार ती जाणीवपूर्वक प्रसिध्दीसाठी करत आहे. तिने समाजमाध्यम (Facebook) पोलीस, न्याय, प्रसारमाध्यम यंत्रणेला वेठीस धरले आहे.

केतकीला एपिलेप्सी म्हणजेच अपस्मार हा दुर्मिळ आजार आहे. या आजाराने ती अनेक वर्षापासून त्रस्त असून त्यामुळे तिचे मानसिक संतुलन बिघडल्याचे बोलले जाते. विशेष म्हणजे या आजाराबद्दलची माहिती तिने स्वतः समाजमाध्यमाव्दारे देऊन सकारात्मकतेचा सल्ला दिलेला आहे. हा आजार कधीच पूर्णपणे बरा होत नसतो. केतकी या आजारावर उपचार घेत आहे. यावरून स्पष्ट होते की, केतकीने मानसिक संतुलन पूर्णतः बिघडले आहे. अशा मानसिक संतुलन नसलेल्या केतकीच्या वाईट गोष्टींना किती प्रसिद्धी द्यायची हे ठरवण्याची वेळ आली आहे.

**समाजमाध्यम स्वातंत्र / भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्य :-**

भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात मूलभूत अधिकारांचा समावेश आहे.

“एकोणिसाव्या कलमात नागरी स्वातंत्र्ये सांगण्यात आली आहेत. भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य (१९ अ), शांततेने व शस्त्राशिवाय एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य (१९ ब), संघटना स्वातंत्र्य (१९ क), भारतीय भूप्रदेशात मुक्तपणे संचाराचे स्वातंत्र्य (१९ ड), भारतीय भूप्रदेशात कोठेही राहण्याचे व स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य (१९ इ) आणि कोणताही धंदा, व्यवसाय, व्यापार अगर उद्योग करण्याचे स्वातंत्र्य (१९ ग) अशी महत्त्वाची नागरी स्वातंत्र्ये या कलमान्वये देण्यात आली आहेत.

ही सर्व स्वातंत्र्ये मूलभूत असली तरी ती अनिर्बंध मात्र नाहीत. भारताचे सार्वभौमत्व व ऐक्य, सार्वजनिक व्यवस्था, भारताचे परराष्ट्राबरोबरचे संबंध आणि नीतिमत्ता यांची हानी होऊ नये म्हणून तसेच न्यायालयांचा अवमान, बदनामी किंवा एखाद्या गुन्ह्याला चिथावणी देणे यांना प्रतिबंध करण्यासाठी कायदे करता येतील व भाषण आणि

अभिव्यक्ती स्वातंत्र्य तेवढ्यापुरते मर्यादित करता येईल. अशा कारणांसाठी इतर स्वातंत्र्येही निर्बंधित करता येतात. स्वातंत्र्यावरील हे निर्बंध आवश्यक आहेत की नाहीत तसेच ते किमान आवश्यक तेवढेच घालण्यात आले आहे की नाही याची तपासणी न्यायालयांना करता येते व स्वातंत्र्याचा अनावश्यक संकोच होत असल्यास तेवढ्यापुरता तो निर्बंध अगर कायदा अवैध ठरवता येतो.

घटनेने दिलेली नागरी स्वातंत्र्ये सर्व नागरिकांना दिलेली आहेत व इतरांच्या स्वातंत्र्याला इजा पोहोचणार नाही अशा बेतानेच ती उपभोगावयाची आहेत. अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्याचा उपयोग इतरांची बदनामी करण्यासाठी, परराष्ट्रांबरोबरचे आपले संबंध बिघडविण्यासाठी, जाती-जातीत वैमनस्य माजविण्यासाठी, सामाजिक नीतिमत्तेला धक्का पोहोचविण्यासाठी अगर असभ्य प्रकारचे लिखाण प्रसिद्ध करण्यासाठी करता येणार नाही. सभा घेण्याचा अधिकार असला तरी रस्त्यावर सभा घेण्याने वाहतूक बंद होते व इतरांची गैरसोय होते. त्यामुळे अशी सभा पोलिसांच्या परवानगीनेच व त्यांनी सांगितलेल्या वेळेतच घ्यावी लागते. ध्वनिक्षेपक लावण्याने इतरांच्या शांततेच्या अधिकाराला अडथळा येत असल्यामुळे त्याच्या वापराचे नियमन पोलिसांसारखे सहकारी अधिकारी करू शकतात. स्वातंत्र्य हे अनिर्बंध असते अशी कल्पना केली, तर एका व्यक्तीच्या स्वातंत्र्योपभोगामुळे दुसऱ्या व्यक्तींचे जीवन असह्य होण्याची व त्यांचे स्वातंत्र्यच संपुष्टात येण्याची भीती असते. म्हणून स्वातंत्र्याचे नियमन करणे आवश्यक आहे. या नियमनामुळे येणारी बंधने किमान असावी. सरकारच्या झालेल्या चुका दाखविणे, लोकांच्या सार्वजनिक अडचणी सांगणे याचा अधिकार असलाच पाहिजे. शासनाच्या कारभारावर टीका करण्याचा अधिकार हा लोकशाही व्यवस्थेतील अत्यंत महत्वाचा अधिकार आहे. त्याचा संकोच होऊ नये म्हणून न्यायालयेही दक्ष असतात.”

केतकीने फेसबुकवर बदनामीकारक पोस्ट टाकून अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा म्हणजेच समाजमाध्यम स्वातंत्र्याचा उपयोग किंवा वापर शरदचंद्र पवार या अत्यंत प्रतिष्ठीत आणि मोठया व्यक्तिची बदनामी करण्यासाठी केला असल्याचे स्पष्ट होते. केतकीने ठाणे न्यायालया समोर आपली बाजू मांडताना सोशल मीडियावर व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य नाही का ? असा सवाल केला होता यावरून तिचे अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दलचे कमालीचे अज्ञान दिसून येते. अशा अनेक केतकी अधूनमधून पुढे येतात त्यांच्या बंदोबस्त करण्याचे आव्हान आपल्या सर्वांपुढे आहे.

**समाजमाध्यम स्वातंत्र्याच्या मर्यादा :-**

मुलभूत अधिकारांमध्ये भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा समावेश असून याच स्वातंत्र्याचा वापर करून आपण सगळे समाजमाध्यम स्वातंत्र्याचा उपभोग घेत असतो. प्रत्येक नागरिक आज समाजमाध्यमांव्दारे व्यक्त होताना दिसतोय. आपले विचार, माहिती देताना आढळतो. समाजमाध्यमांव्दारे व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला जरूर आहे, पण ते एका मर्यादेत. समाजमाध्यमांव्दारे व्यक्त होण्याचे स्वातंत्र अनिर्बंध नाही, तर त्याला काही मर्यादा देखील आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम 19 उपकलम 2 मध्ये या मर्यादा सांगितलेल्या असून त्या खालीलप्रमाणे आहेत.

1) भारताचे सार्वभौमत्वाला धक्का पोहोचवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
2) भारताच्या एकात्मतेला धक्का पोहोचवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
3) राष्ट्रीय सुरक्षिततेला धक्का पोहोचवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
4) परकीय राष्ट्रांबरोबर मैत्रीपूर्ण संबंधाना धक्का पोहोचवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
5) समाजिक सुव्यवस्था, एकोपा बिघडवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
6) सामाजिक सदभिरूची, नैतिकता बिघडवणारे वक्तव्य, लेखन करू नये.
7) न्यायालयाचा अवमान, बदनामी करणारे वक्तव्य, लेखन करू नये.
8) गुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन करणारे वक्तव्य, लेखन करू नये.

वरील मर्यादावरून स्पष्ट होते की, भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा अधिकार अनिर्बंध नाही. भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्यावर फक्त कायद्याव्दारे (अस्तित्वात असलेल्या किंवा नव्याने संमत केलेल्या) बंधने घालता येतात. कायद्याने भाषण स्वातंत्र्यावर फक्त वाजवी बंधने घालता येतात. कायद्याने घातलेली वाजवी बंधने उपकलम 2 मध्ये निर्दिष्ट केलेल्या विषयांच्या संदर्भात असावी लागतात. या विषयांच्या यादीबाहेर असणाऱ्या

विषयाबाबत कोणतेही बंधन घालता येणार नाही. कायद्याने घातलेली मर्यादा वाजवी) आहे का नाही, हे ठरविण्याचा अधिकार न्यायालयांना असतो. भाषण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकार हा फक्त भारतीय नागरिकांना आहे. एवढया सगळ्या मर्यादा असुनही भारतात मात्र समाजमाध्यमांवर अनेक आक्षेपार्ह विधाने, मजकूर टाकले जात आहेत. त्यात केतकीची भर पडली.

**केतकीने निर्माण केलेले समाजमाध्यमविषयक प्रश्न :-**

केतकी चितळेने समाजमाध्यमविषयक अनेक प्रश्न तयार केले आहेत. त्यापैकी काही महत्वाचे प्रश्न खालील प्रमाणे सांगता येतील -

1) स्वहितासाठी, फायद्यासाठी समाजमाध्यमांचा वापर करता येतो.
2) समाजमाध्यमांचा गैरवापर केला की प्रसारमाध्यमे आपोआप वापरता येतात.
3) समाजमाध्यमे, प्रसारमाध्यमे सनसनाटी, स्फोटक, तकलादू बातम्यांच्या मागे असतात.
4) समाजमाध्यमे, प्रसारमाध्यमे हाताशी धरून भरपूर प्रसिद्धी मिळविता येते
5) कुप्रसिध्दीचा उपयोग मॉडलिंग, अभिनय, छोट्या पडद्यासाठी होतो
6) समाजमाध्यमे, प्रसारमाध्यमांच्या गैरवापरामुळे जिवाला धोका आहे, परंतु पोलिस संरक्षण मिळते.
7) समाजमाध्यमांवर काहीही लिहिता, टाकता येते. कशीही आणि कशाचीही उचलेगिरी करता येते
8) समाजमाध्यमांचा चांगले काय, वाईट काय ठरविण्याचा अधिकार नाही
9) भाषण, अभिव्यक्ति म्हणजे अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा गैरवापर सहजपणे करता येतो.
10) समाजमाध्यमांच्या गैरवापराबद्दलची शिक्षेची तरतूद कमी आहे.
11) समाजमाध्यमांची गैरवापराबद्दलचे कायदे जूने, तकलादू आहेत.

**उपाय :-**

समाजमाध्यमं प्रत्येकाजवळ पोहोचलेली असून त्यातून अनेक केतकी, निखिल तयार होऊ शकतात. ते तयार होऊ नये म्हणून वेळीच उपाय केले पाहिजेत ते असे :-

1) समाजमाध्यमांचा वापर सार्वजनिक, सामूहिक हितासाठीच केला पाहिजे अशा प्रकारचा कायदा करावा.
2) समाजमाध्यमांचा गैरवापर करता येऊ नये.
3) प्रसारमाध्यमांनी समाजमाध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांना निषीध्द ठरवावे त्यांची अजिबात दखल घेऊ नये.
4) प्रसारमाध्यमांनी देखील आपला गैरवापर होणार नाही याबद्दल काळजी घ्यावी.
5) समाजमाध्यमांनी स्फोटक, सनसनाटी, खोटया, बदनामीकारक, चुकीच्या माहितीच्या पोस्ट स्वीकारू नये. त्याबद्दल खातरजमा करणारी यंत्रणा उभी करावी.
6) प्रसारमाध्यमांनी समाजमाध्यमांच्या बाबतीत सनसनाटी, स्फोटक बातमी देऊ नये.
7) समाजमाध्यमांना, प्रसारमाध्यमांना हाताशी धरून प्रसिद्धी मिळविणाऱ्यांना बाजूला करावे.
8) कुप्रसिध्दीचा वापर कुठेही करता येणार नाही अशी व्यवस्था तयार करावी.
9) समाजमाध्यमांच्या गैरवापराबद्दल समाजाची पोलिस यंत्रणेची, कायद्याची भिती निर्माण करावी
10) टिका करण्याचा अधिकार आहे. परंतु ती वाजवी, खरी, जनहितासाठी, विकासासाठी असावी. चारित्र्यहननासाठी, बदनामीसाठी तसेच वैयक्तिक नसावी हे प्रत्येकाने लक्षात घ्यावे
11) समाजमाध्यमांनी (प्रसारमाध्यमांसारखी) मते, विचार, लेख, छायाचित्रे, भाषणे प्रकाशित करण्यासाठी संपादक मंडळ नियुक्त करून त्यांच्याव्दारे संपादित करूनच ते प्रकाशित करावेत. सेन्सॉरशिप लागू करावी.
12) समाजमाध्यमांवरील उचलेगिरी थांबविण्यासाठी कडक नियम आणि कायदे करून ते मोडणाऱ्यांविरुद्ध खटले दाखल करुन मोठी शिक्षेची तरतूद ठेवावी.
13) भाषण आणि अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा वापर देश, समाज, जन विकासासाठी होईल याबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करावी
14) समाजमाध्यमांचा गैरवापर करणाऱ्यांविरूध्द कायदे अद्यावत आणि कडक करावेत. शिक्षेची मोठी तरतूद करावी. जेणेकरून गैरवापर करण्याची कुणाचीही हिम्मत होणार नाही.

15) खोटी चुकीची, बदनामीकारक माहिती, पोस्ट टाकणाऱ्यांना समाजमाध्यमांपासून वेगळी, बहिष्कृत करणारी यंत्रणा उभी करावी.

**समारोप :-**

केतकी चितळेने समाजमाध्यमविषयक अनेक प्रश्न निर्माण केलेले आहेत. यापूर्वीही अनेक केतकी निर्माण झाल्या होत्या. भविष्यातही अनेक केतकी उदयाला येणार आहेत. प्रश्न आहे आपण अशा या प्रकरणांकडे गांभीर्याने पाहाणार की नाही. जर पाहाणार नसू, तर त्यामुळे देशाचे आणि समाजाचे मोठे नुकसान होणार आहे. प्रश्न फक्त समाजमाध्यमाच्या गैरवापराचाच नसून त्यामुळे निर्माण झालेल्या अनेक समस्यांचा आहे. या सर्व प्रश्नांवर वेळीच उपाय केले पाहिजेत.

फेसबुक, वॉटस ॲप, ट्वीटर, इन्स्टाग्राम या समाजमाध्यमांचा वापर भविष्यात झपाटयाने वाढणार असून त्या प्रमाणात गैरवापर वाढल्यास देशासह प्रत्येकाचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे समाज, शासन यंत्रणांनी वेळीच कडक उपाप करण्याची आवश्यकता आहे. त्याशिवाय समाजमाध्यमे खऱ्या सार्थाने सर्वांगिण आणि शाश्वत विकासासाठी गतिमान होणार नाहीत. माध्यम कोणतेही असो त्याला गैरवापर लोकशाही शासन व्यवस्थेत न परवडणारा असतो. भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला आणि विविध जाती, धर्म, पंथाच्या बहुआयामी समाजातील नागरिकांना तो कधीच परवडणारा नाही हे विशेष.

**संदर्भ ग्रंथसूची :-**

1) दै. लोकसत्ता, संपादक- चक्रधर दळवी, दि. 15 मे 2022 च्या अंकातील वृत्तलेख, पृष्ठ-4
2) दै. लोकसत्ता, संपादक- गिरीश कुबेर, दि. 15 मे 2022 च्या अंकातील वृत्तलेख, पृष्ठ-4
3) न्या. नरेंद्र चपळगावकर, प्रसारमाध्यमे आणि कायदे, प्रकाशक –डॉ. राजेंद्र वडनेरे, प्रभारी कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट 2006, पृष्ठ- 6,7
4) वैजयंती जोशी, वृत्तपत्रे आणि कायदा, मेहता प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती 2011, पृष्ठ – 21,22
5) वैजयंती जोशी, वृत्तपत्रे आणि कायदा, मेहता प्रकाशन मुंबई, प्रथम आवृत्ती 2011, पृष्ठ – 23
6) www.ketkichitle.com.
7) www.facebook.com

ISSN 2349-638X
www aiirjournal.com